महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत चालविण्यात येणाऱ्या दुग्धतंत्रज्ञान (B.Tech (D.T.)) व मत्स्य विज्ञान (B.F.Sc.) पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कार्यपध्दती ठरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : मपवि २०१७/प्र.क्र.५७/म्हापसू
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ मे, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्र. मपवि २०१७/प्र. क्र. ५७/म्हापसू, दिनांक : ९ ऑगस्ट, २०१७
२) अधिसुचना, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग समक्रमांक, दिनांक: २३ फेब्रुवारी, २०१८
३) शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्र. मपवि २०१७/प्र. क्र. ५७/म्हापसू, दिनांक : २३ फेब्रुवारी, २०१८

परिपत्रक :-

महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८), अंतर्गत, बी.टेक (डी.टी.) / बी.एफ.एस्सी / बी.एस्सी.(ऑनर्स) पशुसंवर्धन या अभ्यासक्रमास संदर्भ क्र २ येथील दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ च्या अधिसूनेन्वये “व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम” म्हणून घोषित व अधिसूचित करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम क्र २८, दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ मधील कलम २३ अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतूदीनुसार संदर्भ क्र ३ येथील दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश परीक्षा (CET) आणि प्रवेश प्रक्रिया आयुक्त, सामायिक प्रवेश परिक्षा तथा सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावरुन राबविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाअंतर्गत दुग्धतंत्रज्ञान पदवी (B.Tech (D.T.)) अभ्यासक्रमाचे दुग्धतंत्रज्ञान महाविद्यालय, वरुड (पुसद) व उदगीर असे २ महाविद्यालये आहेत. तसेच मत्स्य विज्ञान पदवी (B.F.Sc.) अभ्यासक्रमाचे मत्स्य विज्ञान महाविद्यालय नागपूर व उदगीर असे २ महाविद्यालये आहेत.

३. सबब, उक्त अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राबवितांना संबंधित शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात आलेल्या सामायिक परिक्षेमधील प्राप्त गुणांची टक्केवारी (दुग्धतंत्रज्ञान पदवी अभ्याक्रमाकरीता भौतीकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित विषयात प्राप्त गुणांची टक्केवारी व मत्स्य विज्ञान पदवी

अभ्यासक्रमाकरीता भौतीकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र विषयात प्राप्त गुणांची टक्केवारी) व इतर गुणाधिभार/ अतिरीक्त गुण (जास्तीत जास्त २० टक्के) (सोबत जोडलेल्या प्रपत्र- अ आणि ब प्रमाणे) चा समावेश करुन गुणवत्ता निश्चित करुन त्या आधारे प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यात यावी. तसेच प्रवेश प्रक्रिया राबवितांना शासन निर्णय दिनांक ११ जून, २०१३ व शासन शुध्दिपत्रक दिनांक १८ जून, २०१४ आणि दिनांक १५ जून, २०१६ ची तंतोतंत अंबलबजावणी करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संकेतांक २०१८०५२८१७५०५१९१०१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vikas Tulshiram Kadam

Digitally signed by Vikas Tulshiram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9869ec61c857e78e82b7a19b04c6d22f8ef1b8dbc9b19d45ef776d80ef148059, cn=Vikas Tulshiram Kadam
Date: 2018.05.29 15:39:23 +05'30'

(विकास तु. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल-नि-कुलपती यांचे सचिव, राजभवन, मबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुबई ४०० ०३२
३. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुबई ४०० ०३२
४. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे
५. आयुक्त, कृषी/ पशुसंवर्धन/ मत्स्यव्यवसाय/दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र राज्य
६. आयुक्त, सामायिक प्रवेश परिक्षा (CET) तथा सक्षम प्राधिकारी, ३०५, गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक बिल्डिंग, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा-पूर्व, मबई-५१.
७. कुलगुरु/ कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
८. कुलगुरु / कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि रत्नागीरी
९. सह सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुबई ४०० ०३२
१०. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुबई / नागपुर,
११. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबई ४०० ०३२
१२. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबई ४०० ०३२
१३. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१४. सहयोगी अधिष्ठाता, दुग्धतंत्रज्ञान/ मत्स्य विज्ञान महाविद्यालये, उद्‌गीर/वरुड/तेलंगखेडी नागपूर.
१५. निवड नस्ती.

प्रपत्र - अ

WEIGHTAGES FOR B.F.SC. DEGREE COURSE :

The aggregate percentage of marks obtained by the candidate in Physics, Chemistry and Biology at MHT-CET 2018 examination will be corrected with the following additional weightage.

Sr. No.	Particulars	Code No.	Weightage (Max. 20 points)
(a)	Vocational Subject studied in XI & XIIth Std.		
i	Fish Processing Technology	B9	10
ii	Fresh Water Fish Culture	C1	
(b)	7/12 extract or Agriculturist Certificate or Landless Agricultural Labourer Certificate or Fisherman's Certificate	-	12
(c)	Son/Daughter of the Employee of MAFSU, Nagpur or its constituent Colleges, Institutes/Research stations/ Farms	-	3
(d)	NCC 'B' or 'C' Certificate	-	2
(e)	Sports/Debate/Elocution Certificate etc.	-	2
(f)	B.Sc. Degree Certificate.	-	6

(1) Benefit of additional weightage point is restricted to 20 points only.

(2) Merit list will be prepared as per corrected points calculated by adding weightage points in the percentage of PCB marks obtained at MHT-CET 2018 examination.

(3) The original/clearly legible self attested copies of the certificates/documents required for additional weightage must be uploaded. The candidate should claim for weightage if any in his/her application form.

प्रपत्र – ब

WEIGHTAGES FOR B.TECH. (D.T.) DEGREE COURSE :

The aggregate percentage of marks obtained by the candidate in Physics, Chemistry and Mathematics at MHT-CET 2018 examination will be corrected with the following additional weightage.

Sr. No.	Particulars	Code No.	Weightage (Max. 20 points)
(a)	Vocational Subject studied in XI & XII std.		
i	Animal Science and Dairying	B2	10
ii	Animal Sciences-II	76	
iii	Indian Dairy Diploma	1	
iv	Electrical Maintenance	A1	
v	Mechanical Maintenance	A2	
vi	Workshop Tech. & Engineering Drawing	61	
vii	Elements of Mech. Engineering	62	
viii	Elements of Electrical Engineering	63	
ix	Dairy Technology	W1/W2/W3	
(b)	7/12 extract or Agriculturist Certificate or Landless Agricultural Labourer Certificate	-	12
(c)	Son/Daughter of the Employee of MAFSU, Nagpur or its constituent Colleges, Institutes/Research stations/ Farms	-	3
(d)	NCC 'B' or 'C' Certificate	-	2
(e)	Sports/Debate/Elocution Certificate etc.	-	2
(f)	B.Sc. Degree Certificate.	-	6

1) Benefit of additional weightage point is restricted to 20 points only.

2) Merit list will be prepared as per corrected points calculated by adding weightage points in the percentage of PCM marks obtained at MHT-CET 2018 examination.

3) The original/clearly legible self attested copies of the certificates/documents required for additional weightage must be uploaded. The candidate should claim for weightage if any in his/her application form.